नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे
कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिक रोड
Impact Factor - 3.452
ISSN - 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL
SPECIAL ISSUE-LVII (B)
APRIL - 2018

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
## जीवन आणि कार्य

**विशेषांक संपादक मंडळ :**

**अतिथी संपादक :**
**डॉ. लीना पांढरे**
प्राचार्या,
कै. बिंदू रामराव देशमुख कला आणि वाणिज्य
महिला महाविद्यालय, नाशिक रोड

**कार्यकारी संपादक :**
**प्रा. तेजेश बेलदार**
इंग्रजी विभाग,
कै. बिंदू रामराव देशमुख कला आणि वाणिज्य
महिला महाविद्यालय, नाशिक रोड

**सहाय्यक संपादक :**
**प्रा. भास्कर नरवटे व डॉ. मिनल बर्वे**
कै. बिंदू रामराव देशमुख कला आणि वाणिज्य
महिला महाविद्यालय, नाशिक रोड

**मुख्य संपादक :**
**डॉ. धनराज धनगर**
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
म.गांधी विद्यामंदिरचे कला व वाणिज्य महाविद्यालय,
येवला, जि. नाशिक (महाराष्ट्र)



This journal is indexed in :
- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

SWATIDHAN PUBLICATIONS

CamScanner

Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

April 2018

Special Issue – LVII [B]

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन आणि कार्य

विशेषांक संपादक मंडळ

अतिथी संपादक
प्राचार्या डॉ. लीना पांढरे
नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे
कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
नाशिकरोड.

कार्यकारी संपादक
तेजेश बेलदार
साहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग
नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे
कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
नाशिकरोड.

साहाय्यक संपादक
भास्कर नरवटे व डॉ. मीनल बर्वे
नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे
कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
नाशिकरोड.

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर (येवला)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 700/-

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 57 [B] : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन आणि कार्य
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
April 2018

# INDEX


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | जातिव्यवस्थेचे तार्किक विश्लेषण : नवे आव्हान | श्रीनिवास हेमाडे | 07 |
| 2 | दलित चळवळ : काल आणि आज | डॉ. वसंत खरात | 23 |
| 3 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार | डॉ. बाळासाहेब बैरागी | 31 |
| 4 | बौद्धकालीन शिक्षण व्यवस्था | शोभा देवकांबळे | 36 |
| 5 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा खोती पद्धती विरुद्धचा संघर्ष | डॉ. भावना पौळ | 41 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादासंबंधीचे विचार | डॉ. पी. डी. दुधाने | 47 |
| 7 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार | प्रा. हिरा वाघ | 50 |
| 8 | थोर राष्ट्रवादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर | प्रा. मिलिंद पाडेवार | 54 |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वसमावेशक वृद्धीबाबतचे योगदान | प्रा. नारायण गाढे | 59 |
| 10 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'मानवी हक्क' विषयी विचार | प्रा. रमेश राऊत | 64 |
| 11 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत सामाजिक-शैक्षणिक समता | डॉ. आरती लोखंडे | 74 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक-शैक्षणिक समता विषयक विचार | प्रा. प्रवीण शेगावकर | 76 |
| 13 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक व सामाजिक विचार | प्रा. प्रवीण बाचकर | 80 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विषयक विचारांची सद्यकालीन उपयुक्तता | प्रा. भिमराज गायकवाड | 84 |
| 15 | स्त्री मुक्तीचे कडवे पुरस्कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर : विशेष संदर्भ 'हिंदू कोड बिल' | डॉ. हनुमंत कुरकुटे | 86 |
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आर्थिक विकासाची दूरदृष्टी | डॉ. दीपा होळकर | 93 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार | प्रा. किरण तिडके | 97 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'बुद्धिझम' विषयी विचार | प्रा. आर.जे. इंगोले | 100 |
| 19 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय राज्यघटना | प्रा. राजू सानप | 104 |




CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 57 [B] : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन आणि कार्य
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
April 2018

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार

प्रा. किरण सुभाष तिडके
M.A.SET.NET
सहा.प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग
कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नासिकरोड
इ-मेल : tidakekiran@gmail.com
भ्रमणध्वनी : 9579522061

**गोषवारा (Abstract):**

*डॉ. आंबेडकर हे एक महान अर्थशास्त्र होते. बहुआयामी व्यक्तिमत्व असलेल्या आंबेडकरांनी आपल्या आर्थिक विचारांमध्ये शेतीविषयक विचार मांडलेले आहे. शेतीच्या विविध समस्यांचा अभ्यास करून यांनी सामूहिक शेती विषयक विचार मांडले आहे. त्यांनी श्रमिकांच्या हितासाठी औद्योगिक कामगाराला जे फायदे मिळतात ते श्रमिकांना देखील मिळाले पाहिजे, याचा पुरस्कार केला होता. शेतकऱ्यांनी परंपरागत पद्धतीने शेती करण्याऐवजी ती आधुनिक पद्धतीने करावी, यंत्राचा वापर करावा असे यांनी म्हटले होते. शेती हा अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ असल्यामुळे १९ व्या शतकात आंबेडकरांनी भविष्यकाळाचा वेध घेऊन मांडलेले विचार अभ्यासण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनामध्ये केला आहे.*

**बीज शब्द :** उपविभाजन आणि अपखंडन, महसूल संहिता, खोत पद्धती, यांत्रिकीकरण, राज्य समाजवाद.

## प्रस्तावना(Introduction):

कोणत्याही अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्र महत्वाची भूमिका पार पाडते. भारतासारख्या ६५% पेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून असलेल्या देशात शेतीचे स्थान हे काय आहे ? हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. शेती क्षेत्राचा विकास झाला तर देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात वाढ घेऊन देशाच्या आर्थिक विकासात वाढ होऊ शकते. डॉ. आंबेडकरांच्या मते, शेती हा महान राष्ट्रीय उद्योग आहे. परंतु भारतीय शेतीची उत्पादकता ही इतर देशातील शेतीच्या उत्पादकतेपेक्षा खुपच कमी आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये डॉ. आंबेडकरांच्या शेती विषयक विंचारांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives of Research):

1. शेतीच्या समस्या संबंधीत डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास करणे
2. शेतीची उत्पादकता व धारणाक्षेत्रांचे आकारमान यांचा डॉ. आंबेडकरांनी सांगितलेला परस्परसंबंध स्पष्ट करणे.
3. शेतकरी, शेतमजूर, सहकारी शेती व पाणी व्यवस्था याबाबत त्यांच्या विचारांचे अध्ययन करणे.

## संशोधन पध्दती (Method of Research):

संशोधन पेपर तयार करतांना संदर्भ ग्रंथ व पुस्तके यासारख्या दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

## भारतीय शेतीबाबतचे विचार :

डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांमध्ये त्यांचे शेतीबाबतचे विचार महत्वपूर्ण आहे. त्यांच्या मते भारतातील धारणक्षेत्रांचा लहान आकार हे भारतीय शेतीची उत्पादकता कमी असण्याचे कारण आहे, लहान

धारण क्षेत्र असण्याचे प्रमुख कारण वारसा हक्क कायदे नसून वाढणारी लोकसंख्या हे आहे. यावर उपाय म्हणून लहान लहान धारण क्षेत्रांची तुकडे जोड केली पाहिजे व मोठी धारण क्षेत्र निर्माण केली पाहिजे. केवळ एकत्रीकरण करणे पुरेसे नाही तर त्यांचा आकार वाढवून त्याना किफायत शीर करणे सुद्धा महत्वाचे आहे. तसेच एकत्रीकरण झाल्यानंतर भविष्यात पुन्हा धारण क्षेत्राचे तुकडे होणार नाही याची देखील काळजी घेणे आवश्यक आहे, असे त्यानी म्हटले आहे.

### सामूहिक शेती :

डॉ. आंबेडकरांनी लोकशाही पद्धतीवर आधारलेल्या सामूहिक शेती पद्धतीचा पुरस्कार केला. दलित भूमिहीन शेतमजुरांच्या समस्या कुळ कायदे किंवा धारण क्षेत्रांचे एकत्रीकरण यामुळे सुटणार नाही, म्हणून दलितांची स्थिती सुधारण्यासाठी सामूहिक शेती पध्दती उत्तम मार्ग आहे, या पद्धतीमुळे शेतीची उत्पादकता व कार्यक्षमता वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेची स्थिती सुधारेल व अन्याय शोषण हे प्रकार आपोआप बंद होतील, असे, आंबेडकर म्हणतात.

### श्रमिकांबाबताची भूमिका :

डॉ. आंबेडकर श्रमिकांबाबत असे म्हणतात कि जे फायदे औद्योगिक कामगारांना मिळतात ते शेतमजुरांना सुद्धा मिळायला हवे. श्रमिकांचे शोषण पिळवणूक मोठ्या प्रमाणावर केली जात असे. म्हणून भविष्य निर्वाह निधी, नुकसान भरपाई, आरोग्यविमा यासारख्या योजना औद्योगिक कामगारांप्रमाणेच शेतमजूरांनाही लागू केल्याशिवाय त्यांची परिस्थिती सुधारणार नाही, असे आंबेडकरांनी म्हटले होते.

### यांत्रिकीकरण :

यांत्रिकीकरणासंदर्भात गांधीजी व आंबेडकर यांच्या विचारात तफावत आढळते. अविवेकी यांत्रिकीकरणाला गांधीजींचा विरोध होता. तर आंबेडकर त्यांच्या मते लोकशाहीत प्रत्येकाला सुखी जीवन प्राप्त होण्यासाठी अधिक यंत्राचा वापर केला पाहिजे. यंत्राच्या माध्यमाने मानव सुखी आणि सुसंस्कृत होऊ शकतो.

### जमीन महसूल :

डॉ. आंबेडकरांनी जमीन महसुलाबाबत देखील विचार मांडले आहे. उत्पन्नावर जमीन महसूल आकारणे अन्यायकारक आहे, असे त्यांचे मत होते, सर्वांकडून सारखा कर वसूल करण्यापेक्षा काही विशिष्ट रकमेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना जमीन महसुलात माफी मिळाली पाहिजे, म्हणूनच त्यांनी महसूल संहितेचे १०७ वे कलम रद्द करून जमीन महसूल उत्पन्न कराच्या कक्षेत आणला पाहिजे, असे म्हटले होते.

### राज्य समाजवाद :

समाजाची आर्थिक रचना कशी असावी ? हे स्पष्ट करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी ही संकल्पना मांडली आहे, शास्त्रीय समाजवाद आणि निहस्तक्षेपनीती या दोन्ही पद्धतींना त्यांचा विरोध होता. तर मिश्र अर्थव्यवस्थेवर त्यांची श्रद्धा होती, भांडवलशाहीतील विषमता दूर करण्यासाठी लोकशाहीचा मार्ग आंबेडकरांनी सांगितला असून समाजवाद व साम्यावादाऐवजी लोकशाहीचा पुरस्कार केला आहे.

### पाणी विषयक धोरण :

शेतीची उत्पादकता व उत्पादन, यात वाढ करणे सिंचन सुविधा अभावी शक्य नाही, हे लक्षात घेऊन आंबेडकरांनी जलविषयक धोरणांची निर्मिती केली, त्यांच्या प्रयत्नांमुळे मोठे धरण प्रकल्प पुर्णत्वाला जावू शकले, यात दामोदर प्रकल्पाचा उल्लेख करता येईल.

**खोत पध्दती बंद केली :**

जमीन कसण्याची खोत पध्दती ही कुलाबा, रत्नागिरी या सारख्या जिल्ह्यात त्याकाळात अस्तित्वात होती, या पद्धतीत 'खोत' महसूल गोळा करून तो सरकारला जमा करत असे, त्यामुळे शेतकऱ्यांना सरकार व खोत यांना वेगवेगळे कर द्यावे लागत असे, म्हणून शेतकऱ्यावरील हा अन्याय दूर करण्यासाठी आंबेडकरांनी १९३७ मध्ये खोत पध्दती रद्द करणारे विधेयक मुंबई कायदे मंडळात मांडले.

**निष्कर्ष :**

डॉ. आंबेडकरांच्या शेतीविषयक विचारांचा आढावा घेता लक्षात येते कि, शेत जमिनीच्या विभाजन व तुकडीकरणाने शेतीची उत्पादकता कमी होते, म्हणून शेतजमिनीच्या एकत्रीकरणावर भर दिला पाहिजे, शेती ही भारतीय लोकांच्या उपजीविकेचे साधन असून संपूर्ण देशाचे भवितव्य शेती व्यवसायावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी परंपरागत दृष्टीकोना ऐवजी आधुनिक दृष्टीकोनातून शेती करावी हे त्यांचे विचार आजच्या काळातही महत्वाचे वाटतात, शेतीचे व्यवस्थापन चांगले नसेल तर सुस्थितीत असलेला व्यवसाय देखील तोट्यात जावू शकतो. याउलट व्यवस्थापन उच्च दर्जाचे असेल तर तोट्यातील व्यवसाय सुस्थितीत येवू शकतो.

**संदर्भ :**

1. **डॉ.व्ही. कविमंडन** - आर्थिक विचारांचा विकास, **पान क्रमांक** ३७४ ते ३७८, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, २००९
2. **डॉ.एस.उगले** - आर्थिक विचारांचा इतिहास, ८.१० ते ८.१४, सक्सेस प्रकाशन, पुणे, २०१५

RESEARCHJOURNEY



CamScanner